जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक १३.११.२०२४**

## " जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतास शिताफिने अटक "

फिर्यादी सौ. निलु रमेश यादव, वय ३६ वर्षे, रा. उपवन, ठाणे. या दिनांक ११/११/२०२४ रोजी दुपारी १२:३० वा. सुरारास मीलन हील बील्डींग येथील स्वामी समर्थ मठाला लागुन असलेल्या जंगलातील पायवाटेने येत असताना एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांना ढकलुन देवून फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र बळजबरीने खेचुन घेवुन तो स्वामी समर्थ मठाचे बाजुलगत असलेल्या जंगलात पळुन गेला म्हणुन दि. ११/११/२०२४ रोजी वर्तकनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं १०८७/२०२४ भा.न्या.सं. कलम ३०९(४) प्रमाणे नोंद करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने फिर्यादी यांचेकडे मोठया कौशल्याने विचारपुस करून यातील आरोपीच्या वर्णनाबाबत माहीती प्राप्त करून लागलीच सदर घटनास्थळाचे परीसरात तांत्रीक माहीती गोळा करून व सदर माहितीचा बारकाईने तपास करून त्याआधारे यातील आरोपीत हा रामनगर, श्रीनगर, ठाणे या भागातील असल्याची माहीती वर्तकनगर पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक चिंतामण व त्यांच्या पथकाने प्राप्त करून तेथील गुप्त बातमीदारामार्फत यातील आरोपीताची खात्रीलायक माहीती प्राप्त केली व योग्यप्रकारे सापळा रचुन त्यास पळुन जाण्याची संधी न देता मोठया शिताफिने ताब्यात घेतले. सदर इसमाकडे चौकशी केली असता त्याने सदर गुन्हा केला असल्याची कबुली दिल्याने सदर आरोपीत नामे युगेश बळवंत यादव, वय ३४ वर्षे, रा.दयाशंकर चक्की यांची चाळ, कृष्णा चौक, रागनगर, श्रीनगर, ठाणे यास सदर गुन्हयात अटक करून तपासा दरम्यान त्याचेकडुन सदर गुन्हयातील जबरी चोरी केलेले ३५,०००/- रू किमतीचे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र हस्तगत करून सदर जबरीचोरीचा गुन्हा उघडकीस आणुन उल्लखेनिय कामगिरी केलेली आहे.

सदर उल्लेखनिय कामगिरी पोलीस उप आयुक्त परि-५ श्री.अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त वर्तकनगर विभाग श्री.मंदार जावळे, तसेच वर्तकनगर पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजकुमार वाघचवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्री. शिवराज म्हेत्रे, पो.नि.(गुन्हे) श्री.मल्हारी कोकरे, तपास पथकाचे पोउपनि/व्हि.जे. चिंतामण, पो.हवा./३२१४ जाधव, पोहवा/४१७४ महाडिक, पोहवा/६६७५ राठोड, पोना/७०५० पाटोळे, पोशि/३००६ सौदागरे, पोशि/८१३४ नागरे यांनी केली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर